# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरीतील जात पडताळणी कार्यालयात अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(१) ४१८६ (२२-१२-२०१४). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरीतील जात पडताळणी कार्यालयात २ हजार ४८९ प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षभराच्या कालावधीत विभागीय कार्यालयात रिक्त झालेल्या पदांमुळे प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जात पडताळणी कार्यालयात मंजूर १९ पदांपैकी तब्बल ११ पदे रिक्त असून याचा भार कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत असल्याचे समजते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, व त्यानुसार रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) अद्याप, कोणत्याही उपाययोजना केल्या नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-०२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे. माहे ऑक्टोबर, २०१४ अखेर २४८९ प्रकरणे प्रलंबित होती.

(२) खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) समितीचे अध्यक्ष या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. सदर पद व इतर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर-गारगोटी राज्यमार्ग तीन पदरी करण्याबाबत**

**(२) ६३६१ (१०-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-गारगोटी राज्यमार्ग तीन पदरी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रस्ताव शासनाकडे केव्हापासून प्रलंबित आहे तसेच सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर राज्यमार्गाचे काम लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१), (२), (३) व (४) कोल्हापूर-गारगोटी या एकूण ५० कि.मी. लांबीपैकी २३.१०० कि.मी. लांबीचा रस्ता तीन पदरी करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ३.९.२०१५ च्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर केला आहे. सदर रस्त्याचे काम मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्यात येईल.

---

**रायगड जिल्हयातील पेण अर्बन बँकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत**

**(३) ६४४० (१०-०४-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) अर्बन बँक अवसायनात काढण्याचा सहकार आयुक्तांनी दिनांक २९ एप्रिल, २०१४ ला घेतलेला निर्णय शासनाने रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) पेण अर्बन बँकेच्या मालमत्तांच्या मुल्यांकन, विक्री प्रक्रिया संदर्भात व ठेवीदारांच्या प्रश्नांसंदर्भात रायगड जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास पेण अर्बन बँक ठेवीदार संघर्ष समितीची अध्यक्ष व ठेवीदारांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पेण अर्बन बॅकेतील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) होय.

(२) होय.

जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२.१.२०१५ रोजी बैठक घेण्यात आलेली होती.

(३) सदर बैठकीमध्ये दि.२४.११.२००४ रोजी लिलाव प्रक्रियेकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीने केलेल्या कार्यवाहीचा, बँकेच्या मालमत्तांचे मुल्यांकन व विक्री करणे आणि ठेवीदारांच्या प्रश्नासंदर्भात आढावा घेण्यात आलेला आहे.

अ) मालमत्तांच्या लिलावा संदर्भात परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही करणेबाबत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पेण यांना सुचना देण्यात आल्या.

ब) बँकेच्या बोगस १२८ कर्ज प्रकरणांची कागदपत्र सी.बी.आय.कडे असल्याने सदर कागदपत्रांची मागणी कोर्टामार्फत मिळवून पोलिस विभागास पुरविण्याबाबत सुचित करण्यात आले.

क) बँकेच्या संचालक मंडळाच्या मालमत्तेवर बोजा चढविणेबाबत सक्षम प्राधिकरणाकडून आदेश प्राप्त झाल्यावर बोजा चढविण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

(४) महाराष्ट्र ठेवीदार हितसंरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ४ व ५ प्रमाणे शासनाने जप्त केलेल्या जमिनीच्या लिलाव प्रक्रियेबाबत मुल्यांकनाची कार्यवाही अद्यापपर्यंत चालू असून, मुल्यांकनकाराकडून जमिनीचे मुल्यांकन अहवाल प्राप्त झालेले नाहीत. बँकेचे प्रशासक मंडळ अध्यक्ष यांनी एन्फोर्समेंट विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेवून त्यांनी बँकेच्या मालमत्तांच्या विक्री व हस्तांतरण मनाई हुकुम रद्द करण्याबाबत चर्चा करुनही अद्यापपर्यंत त्या खात्याकडून काहीही कळविण्यात आलेले नाही. ठेवीदार संघर्ष समितीने बँकेच्या मालमत्तेच्या विक्री व हस्तांतरण मनाई हुकूम रद्द करणेबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.९६२/२०१५, दिनांक ९.३.२०१५ रोजी दाखल केली आहे. बँकेने ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत रु.३८.७३ कोटी राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीदार सुरक्षित ठेवल्या आहेत.

---

### दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोर महामार्गातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्याबाबत

**(४) ७६३० (१०-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील दिल्ली ते मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोअर प्रकल्पासाठी रा.मा.क्र. ९२ ते ९७ चे आठपदरीकरण करण्याचा प्रस्ताव शासनाने अंमलात आणाला असून रायगड जिल्हयातील ७ तालुक्यातील १४८ गावे बाधीत होणार आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधागड, मुरूड, खालापूर, रोहा या ४ तालुक्यातील ८५ गावे तर म्हसळा, श्रीवर्धन व माणगाव या ३ तालुक्यातील ६३ गावातील जमिनी संपादित केल्याने येथील शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येणार हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या महामार्गाचा प्रस्ताव मंजूर करताना प्रकल्पग्रस्तांचा विचार केला आहे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) सदर प्रस्ताव प्राथमिक स्तरावर असून उद्योग विभागातर्फे प्रकल्पाचे समन्वय करण्यात येते. रस्त्याच्या अनुषंगाने तांत्रिक बाबी करिता सार्वजनिक बांधकाम विभाग सहकार्य करते.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलादपूर (जि.रायगड) येथील कशेडी घाटामधील शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनी संपादित करुनही उत्खननाचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(५) ८३१९ (१५-०५-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलादपूर (जि.रायगड) येथील कशेडी घाटामधील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सन २०१३ पासून प्रगतीपथावर असूनही या कामासाठी ज्या आठ गावातील शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी संपादीत केल्या होत्या त्या जमिनीच्या उत्खननाचा मोबदला अद्यापही मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून अवजड वाहने या नविन रस्त्यावरुन गेल्यास अपघात होत असून याकडे संबंधित शाखा अभियंता / इतर तत्सम अधिकारी गुणवत्ता व दर्जा नियंत्रणासाठी उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकात पाटील (२३-०७-२०१५) :** (१) नाही.

सदरचे रुंदीकरणाचे काम राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अखत्यारीत (ROW) असलेल्या जमिनीवरच करण्यात आलेले आहे. यासाठी नवीन भुसंपादन करण्यात आलेले नाही त्यामुळे शेतकऱ्यांना / जमीन मालकांना मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) नाही.

संबंधित काम हे मानकाप्रमाणे करण्यात आलेले आहे. उपरोक्त काम क्षेत्रिय अधिकारी यांचे देखरेखीखाली काम करण्यात आले आहे व कामाबाबतच्या आवश्यक त्या चाचण्या वेळोवेळी घेण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रुपी बँकेमधील ठेवीदारांच्या रकमा परत करणेबाबत**

**(६) ८३३६ (१०-०४-२०१५). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रूपी बँकेच्या एकूण शाखेत १४०० कोटी रूपयांचा ठेवी आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर बँकेच्या शाखेत पिंपरी-चिंचवड-भोसरी भागातील नागरिकांच्या २०० कोटी रूपयांचा ठेवीचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बँक सध्या अवसायनात जाण्याची शक्यता निर्माण झाली असून ठेवीदारांच्या रकमा त्यांना परत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :**(१) रुपी को.ऑप.बँक.लि. पुणे या बँकेच्या एकूण ३४ शाखा असून सदर बँकेत रु.१५१६.३२ कोटीच्या ठेवी आहेत.

(२) सदर बँकेच्या पिंपरी-चिंचवड-भोसरी शाखेत रु.२२५.४९ कोटीच्या ठेवींचा समावेश आहे.

(३) रुपी बँकेवर बँकींग रेग्यूलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम ३५ अ नुसार रिझर्व्ह बँकेने निर्बंध लादले आहेत. सदर निर्बंधांची मुदत वेळोवेळी वाढवून दिलेली आहे. सदरची मुदत दि.२१.८.२०१५ पर्यंत आहे. सहकार खात्याने नियुक्त केलेल्या प्रशासक मंडळाने कॉर्पोरेशन बँक, युनियन बँक, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, कोटक महिंद्र बँक, फेडरल बँक व अन्य बँकांशी रुपी बँकेच्या ॲसेटस ॲन्ड लायबिलीटीज ट्रान्सफर करण्याबाबत प्रयत्न केले होते. परंतु त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. तद्नंतर रुपी बँकेवर सहकार खात्याकडून दिनांक २८.५.२०१५ च्या आदेशान्वये त्रिसदस्यीय बँकिंग तज्ञांचे प्रशासक मंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई, महापे औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांनी उद्योग सुरु न करताच बँकाकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतल्याबाबत**

**(७) ८५८२ (०९-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, महापे औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांनी उद्योग सुरु न करताच बँकाकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योजकांनी जमीन बँकांकडे गहाण ठेवून कर्जे घेतल्याने पडीक जमीन पुन्हा ताब्यात घेण्यात एम.आय.डी.सी.ला अडचणीचा सामना करावा लागतो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे काय, व त्याअनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर शासनाद्वारे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड हे उद्योगांसाठी महामंडळाने निश्चित केलेल्या दराने वाटप केले जातात. वाटप केलेला भूखंड वित्तीय संस्थेकडे तारण ठेऊन कर्ज घेणेकरिता उद्योजकास परवानगी देण्यात येऊन वित्तीय संस्था, उद्योजक आणि महामंडळ यांचेकडे त्रिपक्षीय करारनामा कार्यान्वीत करण्यात येतो.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील वाटप करण्यात आलेले भूखंड संबंधित उद्योजक बँकाकडे तारण ठेवतात. तथापि, सदर भूखंड परत घेतांना महामंडळास तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे विनावापर पडून असलेले भूखंड विहीत मुदतीनंतर करारनाम्यातील कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार भूखंड परत ताब्यात घेण्याची कार्यवाही करतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने नव्या दरपत्रकाची अंमलबजावणी न करता ओबीसी विद्यार्थ्यांना जुन्याच दरपत्रकाने मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे वाटप केल्याबाबत**

**(८) ८५८६ (१०-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने केंद्र शासनाने दिलेल्या नव्या दरपत्रकाची अंमलबजावणी न करता ओबीसी विद्यार्थ्यांना जुन्याच दरपत्रकाने मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे वाटप करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुलै, २०१४ पासून नव्या दरपत्रकाची अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्वच राज्यांना केंद्राने दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले ,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१५) :**(१), (२), (३) व (४) केंद्र शासनाची इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये केंद्र शासनाने दिनांक ११/०८/२०११ च्या निर्देशानुसार शिष्यवृत्तीमधील निर्वाह भत्ता दर व अभ्यासक्रम गटामध्ये सुधारणा केल्या आहे. परंतु सदर सुधारणा राज्यात लागू करण्यात आलेल्या नाहीत.

त्यामुळे सद्यःस्थितीत जुने अभ्यास गट व जुन्या दरानेच निर्वाह भत्ता दिला जात आहे. सदर सुधारणा लागु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील जमिनीवर उदयोग उभारण्याऐवजी जमिनी बँका व वित्तीय संस्था याचेंकडे तारण ठेवून कर्जे घेतल्याबाबत

**(९) ९०४० (१०-०४-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, तळोजा, पनवेल, महाड, आणि रोहे येथील शासनाने दिलेल्या जमिनीवर उद्योग उभारण्याऐवजी बँका व वित्त संस्था यांचेकडे जमिन तारण ठेवून कोटयवधीची कर्जे घेतली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१०-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड हे उद्योगांसाठी महामंडळाने निश्चित केलेल्या दराने वाटप केले जातात. वाटप केलेला भूखंड वित्तीय संस्थेकडे तारण ठेऊन कर्ज घेणेकरीता उद्योजकास परवानगी देण्यात येऊन वित्तीय संस्था, उद्योजक आणि महामंडळ यांचेमध्ये त्रिपक्षीय करारनामा कार्यान्वित करण्यात येतो.

ज्या उद्योजकांस वित्त सहाय्यासाठी संमतीपत्र देण्यात आले आहे. तथापि, उद्योजक कर्ज फेडण्यास असमर्थ ठरल्यास वित्तीय संस्था सदर भूखंड ताब्यात घेते आणि कर्ज वसुलीकरिता सदर भूखंडाची विक्री संबंधित कायद्यांतील तरतुदींप्रमाणे लिलावाद्वारे करते.

त्यानंतर सदर भूखंड विकत घेणा-या उद्योजकास महामंडळाच्या हस्तांतराबाबतचे मार्गदर्शक तत्त्वानुसार आवश्यक हस्तांतर शुल्क व इतर देय रक्कमा वसुल करुन हस्तांतर करण्यास महामंडळामार्फत परवानगी देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जातेगाव-टेंभुर्णी (ता.करमळा, जि. सोलापूर) येथील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम बंद असल्याबाबत**

**(१०) ९५५५ (१०-०४-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर-टेंभुर्णी महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी करमाळा तालुक्यातील (जि.सोलापूर) जातेगाव टेंभुर्णी येथील १८ गावांमधील शेतक-यांच्या जमिनी संपादित करुनही एकाही गावातील जमिनीचा मोबदला दिला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधा व हस्तांतरित करा (बीओटी) तत्त्वावर काम घेतलेल्या सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून गेल्या सहा महिन्यापासून काम बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
सद्यःस्थितीत एकाही गावातील जमिनीच्या भूसंपादनाचे काम पूर्ण झालेले नाही.
(२) अंशतः खरे आहे.
भुसंपादन प्रक्रिया पूर्ण न झाल्याने प्रकल्पांचे बांधकाम संथ गतीने सुरु आहे.
(३) व (४) भूसंपादन प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे प्रकल्पाच्या बांधकामास विलंब होत आहे. भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

**रत्नागिरीपासून गणपतीपुळेकडे जाताना मि-या स्मशानभूमीपासून ते शिरगाव उर्दू शाळेपर्यंत पूल उभारण्याबाबत**

**(११) १०२५३ (०९-०४-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरीपासून गणपतीपुळेकडे जाताना शिरगाव येथे अरुंद रस्त्यामुळे दररोज वाहतूक कोंडी होत असून सदरहू अरुंद रस्त्याचे रुंदीकरण करण्यास निर्माण झालेल्या गंभीर समस्येमुळे मि-या स्मशानभूमीपासून ते शिरगाव उर्दू शाळेपर्यंत पूल उभारण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने शासनाकडे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या सुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, अद्यापी निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,
(३) तसेच रत्नागिरीपासून गणपतीमुळे येथे जाण्यासाठी शिरगाव येथील अरुंद रस्त्यामुळे होणारी वाहतूकीची कोंडी विनाविलंब सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) व (४) वाहतूकीची कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने अरुंद लांबीतील रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम निकष मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**रामटेक येथील (जि.नागपूर) शीतलवाडी पाणी पुरवठा करणारी योजना बंद असल्याबाबत**

**(१२) १११०३ (०७-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक येथील (जि.नागपूर) शीतलवाडी पाणी पुरवठा करणारी योजना गेल्या काही महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना बंद असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर योजना तातडीने सुरू करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१६-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) योजनेच्या विजेचे बिल न भरल्यामुळे योजना दि.१०.११.२०१४ पासून बंद होती.
(३) थकित विद्युत देयकाचे १० टक्के रक्कम भरुन व आवश्यक दुरुस्ती करुन बंद योजना दिनांक ४.५.२०१५ पासून शिखर समिती मार्फत पुन:श्च सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या अनुसूचित जाती उप योजनांबाबत**

**(१३) १११९८ (०९-०४-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागांमार्फत राबविण्यात येणा-या अनुसूचित जाती उपयोजनांचा आराखडा जिल्हा नियोजन मार्फत मंजूर केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व उपयोजनांना लागणारे अनुदान मंत्रालयामार्फत मंजूर होऊन वितरीत केल्या जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा सर्व साधारण योजना तसेच आदिवासी उपयोजनाचे प्रमाणे अनुसूचित जाती उपयोजनांना सुध्दा जिल्हा नियोजन मार्फत निधीचे वितरण करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, मंत्रालयामार्फत मंजूर होणारे अनुदान त्वरीत जिल्हा स्तरावर वितरीत करण्यासाठी पर्यायी उपाययोजना काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०७-२०१५) :** (१) जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजनेचे प्रारुप आराखडे जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने या विभागास प्राप्त होतात. शासन मान्यतेने या योजनेला अंतिम स्वरुप देण्यात येते.
(२) योजना निहाय नियतव्ययाचे वाटप सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात येते. सदर नियतव्यय अर्थसंकल्पित करुन घेणे, निधीचे वाटप जिल्हास्तरापर्यंत करणे, योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे व त्याचे समन्वयन करणे इ. बाबी संबंधित प्रशासकीय विभागामार्फत केल्या जातात.
(३) व (४) अनुसूचित जाती उपयोजनेतील जिल्हा वार्षिक योजनेचा निधी वितरीत करणेबाबत वित्त विभागाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## जळगाव येथे जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रातील अपंग बांधवांना साहित्य वाटप न झाल्याबाबत

**(१४) ११२३४ (०९-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राची स्थापना दिनांक २७ डिसेंबर, २०१३ रोजी जळगांव येथे झाली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अपंग व्यक्तींच्या विकासासाठी, पुर्नवसनासाठी आणि प्रशिक्षणासाठी मिळणा-या सहायासाठी ९८६ अपंगाची नोंदणी झाली हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत या अपंग बांधवांना साहित्य वाटप झाले नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अपंग बांधवांना साहित्य वाटप करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अशंतः खरे असून जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राकडे साहित्य मागणीसाठी एकूण २०७ लाभार्थ्यांसाठी नोंदणी झाली आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) उपरोक्त जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र हे केंद्र शासनाच्या डीडीआरएस व एडीप योजनेतंर्गत चालविण्यात येतात. सदर केंद्रामार्फत अपंगांना साहित्य वाटप करण्याकरिता अनुदान मिळणेबाबतचे सन २०१४-१५ चे प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास पाठविण्यात आलेले आहेत. तथापि, अद्याप अनुदान उपलब्ध न झाल्याने प्रस्तुत केंद्रामार्फत अपंगांना साहित्य वाटप करता आलेले नाही. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होताच जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रामार्फत साहित्य वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**जळगांव जिल्हा प्रशासनामार्फत आम आदमी योजनेमध्ये लाभार्थी लाभापासून वंचित राहत असल्याबाबत**

**(१५) ११२३५ (१०-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) श्री. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आम आदमी विमा योजनेबाबत जळगांव जिल्हा प्रशासनामार्फत पडताळणी झालेल्या १४२ प्रकरणात लाभार्थी लाभापासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या योजनची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जळगांव जिल्ह्यात सन २०१४-१५ या वर्षामध्ये आम आदमी विमा योजनेच्या दाव्यांची एकूण ९३५ प्रकरणे प्राप्त झाली त्यापैकी एल.आय.सी. नाशिक कार्यालयास ७३३ प्रकरणे मंजुरी करीता सादर करण्यात आलेली असून २८३ प्रकरणी एल.आय.सी. ने वारसांना लाभ दिला आहे. तर ४४१ प्रकरणे एल.आय.सी.कडे प्रलंबित आहेत. २०२ प्रकरणे कागदपत्रांच्या पुर्तते अभावी तहसिल कार्यालयाकडे प्रलंबित असून विशेष मोहिम राबवून प्रकरणे एल.आय.सी.कडे सादर करण्याचे संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

(३) योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधीत क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण माहे जून मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आयोजित करण्यात येत आहे.

---

**सामाजिक न्यायमंत्री व संबंधित अधिकारी यांनी संगमताने निधी मंजूर करताना बोगस कागदपत्रांचा वापर केल्याबाबत**

**(१६) ११४२३ (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बनावट पध्दतीने नोंदणीकृत केलेल्या अनेक मागासवर्गीय औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थाकडून प्रस्ताव मागवून तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री व संबंधित अधिकारी

यांनी संगमताने ७ कोटी रुपयांपर्यंत निधी मंजूर केला असून प्रत्यक्षात ५ कोटी रुपयांचा निधी संस्थांना उपलब्ध करुन दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करताना बनावट कागदपत्रांचा वापर करण्यात आल्याने संबंधित संस्था बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणात शासनाने चौकशी केली आहे काय तसेच संबंधित अधिका-यांविरुध्द काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०७-२०१५) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) या प्रकरणी कोणत्याही अधिका-यांचा संबंध नसल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच अर्थसहाय्य वितरीत करण्यात आलेल्या ३७२ औद्योगिक सहकारी संस्थांतील उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केलेल्या व ७०% अर्थसहाय्य प्राप्त होवून २ वर्षे झालेल्या २४० संस्थांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार दोषी संस्थांविरुध्द गुन्हा नोंदविण्याबाबत संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्तांना कळविण्यात आले आहे. तसेच दोषी संस्थांविरुध्द सहकारी संस्था कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना कळविण्यात आलेले आहे. चौकशी अंती दोषी आढळून आलेल्या संस्थांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाशिम जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून विशेष रस्ते दुरुस्तीची कामे निधीअभावी बंद असल्याबाबत

**(१७) ११५०७ (१५-०५-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २०१२-१३ मध्ये विशेष रस्ते दुरुस्ती (गट ब व क) ची कामे मंजूर करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ते विकासाची ही कामे निधी अभावी सुरु झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रस्ते विकासाची कामे पूर्ण करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकात पाटील (१७-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

वाशिम जिल्ह्यातील कामांसाठी सन २०१२-१३ मध्ये विशेष दुरुस्ती (गट ब व क) कार्यक्रमास शासनाकडून मंजूरी प्रदान करण्यात आलेली नाही.

(२), (३) व (४) सन २०१३-१४ मध्ये विशेष दुरुस्ती अंतर्गत (गट-ब व गट-क) ३७ कामाच्या कार्यक्रमास रु.१३०७.८५ लक्ष किमतीस मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याअंतर्गत सर्व ३७ कामे सद्य:स्थितीत पूर्ण झालेली आहेत.

---

**मागासवर्गीय समाजाच्या हितासाठी कार्यरत असलेल्या सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती व अन्य दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची अडवणूक केली जात असल्याबाबत**

**(१८) १२१२० (१०-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय समाजाच्या हितासाठी कार्यरत असलेल्या सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती व अन्य दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची अडवणूक केली जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) अभियांत्रिकी वा तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना त्यात स्थानच देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळावा यासाठी प्रवेश धोरणात बदल करण्यात येणार आहे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०७-२०१५) :** (१), (२) व (३) नाही.

अभियांत्रिकी तसेच इतर तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना प्रत्येक शासकीय वसतिगृहामध्ये निश्चित करुन दिलेल्या कोट्यानुसार प्रवेश देण्यात येतो.

तथापि, डिप्लोमा पूर्ण होऊन अभियांत्रिकीच्या दुस-या वर्षाला प्रवेश होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या व आयटीआय पूर्ण होऊन पॉलिटेक्निकला प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाबाबतच्या प्रचलित धोरणात दि.१८ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील आडसूळ फाट्यापासून ते तळेगाव, पातुर्डा, डवला व बाभूळगाव गावांना जाण्या-येण्यासाठी रस्ता व पुल बांधण्याबाबत

**(१९) १२७९१ (२८-०५-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील तळेगाव, पातुर्डा, डवला व बाभूळगाव या गावांना जाण्यासाठी रस्ता व पुल कित्येक वर्षापासून नादुरुस्त असल्याने येथील रस्ता व पुलाचा प्रस्ताव स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठवूनही तसेच तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी वांरवांर मागणी करुनही अद्यापही समस्या सोडविली न जाणे त्यामुळे संबंधीत गावातील दुस-या गावातील नागरिकांशी पावसाळ्यात संपर्क तुटणे तसेच तेथील नागरिकांना अनेक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांना रस्ता व पुल नसल्यामुळे पावसाळ्यात संपर्क तुटणे ये जा करण्यासाठी रस्त्याची समस्या होत असून आजारी व्यक्तींना, गरोदर महिलांना डोलीत बसून शहराच्या ठिकाणी आणावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहु गावांना रस्त्यांच्या मुलभूत सोयी पुरविण्याच्यादृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) व (२) होय.

(३) व (४) प्रश्नाधीन रस्ते व पुलांची कामे निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याच्या प्रयत्न राहील.

---

## कोल्हापूर जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट परत घेण्याबाबत

**(२०) १२८६० (१०-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील औद्योगिक क्षेत्रातील तब्बल ९५५ प्लॉट गेल्या १५ वर्षापासून पडून आहेत, हे खरे आह काय,

(२) असल्यास, मा.उद्योग मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये केलेल्या घोषणेनुसार सदरचे प्लॉट परत घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये वाटप करण्यात आलेल्या भूखंडापैकी १८४ भूखंडधारकांनी महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार विहीत कालावधीत भूखंड विकसीत केला नाही. त्यामुळे त्यांना नोटीस बजाविण्यात आल्या असून त्यापैकी ९ भूखंडधारकांकडून महामंडळाने भूखंड ताब्यात घेतले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६० वर्षे करण्याबाबत**

**(२१) १३१४७ (१०-०४-२०१५). श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांकरिता सरकारने केलेल्या धोरणात कुठलीही आर्थिक तरतुद नसल्याने या धोरणाचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना होत नसल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नगरिकांची केंद्र शासनाचे धोरणाप्रमाणे वयोमर्यादा ६० वर्षे असतांना महाराष्ट्रात ६५ वर्षे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वयातील या तफावतींमुळे राज्यातील ३० लक्ष जेष्ठ नागरिक या सवलतीपासून वंचित आहे, हे खरे आहे काय, तसेच उक्त धोरणामध्ये वयातील तफावतीचे कारणे काय आहेत,

(४) तसेच राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६० वर्षे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) व (४) राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ वरुन ६० वर्षे करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या घरकुल योजनेचे बांधकाम न करताच लाभार्थ्यांनी निधी हडप केल्याबाबत**

**(२२) १३७२५ (१०-०४-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरखेड पंचायत समिती अंतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा मार्फत राबविण्यात

येणा-या रमाई घरकुल योजना, इंदिरा आवास योजना, कोलाम घरकुल योजना व राजीव गांधी क्र.१ घरकुल योजना मधील ८४० घरकुलांचे लाभार्थ्यांनी प्रथम व दुसरा हप्ता उचलून अद्यापपर्यंत घरकुलाचे बांधकाम केलें नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरखेड पंचायत समिती अंतर्गत सन २०१०-११ ते सन २००१४-१५ पर्यंत घरकुल योजनेमध्ये गैरप्रकार झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणामार्फत सन २०१० ते २०१५ मधील ८४० लाभार्थ्यांनी योजनेअंतर्गत रक्कम उचल केली असून अद्यापपर्यंत घरकुलाचे बांधकाम न करता दुस-याचेच घरे दाखवून संपूर्ण निधी हडप केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाकडून उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) मौजे-कुरळी येथील घरकुलाचे बांधकाम न करता लाभार्थ्यांना अनुदान वितरित केलेल्या प्रकरणास जबाबदार असलेल्या शाखा अभियंता यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

मौजे-चातारी येथील घरकुलाच्या लाभार्थ्यांना दुबार लाभ दिल्याप्रकरणी दोषी असलेल्या कनिष्ठ अभियंता यांना निलंबित करण्यात आले आहे. शाखा अभियंता यांच्या २ वेतनवाढी कायमस्वरुपी बंद करण्यात आलेल्या आहेत. सहायक लेखा अधिकारी व कनिष्ठ सहायक यांची १ वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे तसेच संबंधीत लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल करुन शासकीय खात्यात जमा केली आहे.

मौजे-सुकळी, ता-उमरखेड येथील दुबार प्रकरणी तेथील शाखा अभियंता ग्रामसेवक व कनिष्ठ सहाय्यक यांच्याकडून खुलासा मागविण्यात आलेला आहे. तसेच लाभार्थ्यांना उचल केलेली रक्कम शासनखाती जमा करण्याची नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची जात पडताळणीसाठी सादर केलेले सर्व कागदपत्रे परत देऊन नव्याने ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत

**(२३) १४८५७ (१०-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता ११ वी १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची सन २०१३-१४ मधील जात पडताळणीसाठी सादर केलेले सर्व कागदपत्रे परत देऊन नव्याने ऑनलाईन पध्दतीने दिनांक ३१ डिसेबर, २०१४ रोजीपर्यंत सादर करण्याबाबत शासनाने आदेश काढले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या कमी कालावधीत पुन्हा सर्व कागदपत्रे मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना बरीच धावपळ करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील उपविभागीय कार्यालयातून जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दलाल रु.१०००/- रक्कम घेत असल्याची तक्रार बुलढाणा जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१५) :** (१) व (२) नाही. हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१४ पासून जात पडताळणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याची प्रक्रिया सुरु आहे. ऑनलाईन अर्ज स्विकारताना जे अर्ज जाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात पूर्वी प्राप्त होते ते परत करण्यात आलेले नसून त्यावर नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.

तसेच ऑनलाईन अर्ज स्विकारताना कुठल्याही प्रकारच्या जादा कागदपत्रांची अर्जदाराकडून मागणी करण्यात आलेली नसल्यामुळे अर्जदारांनी कागदपत्रांकरिता धावपळ करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) नाही. हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अपंगांच्या पुनर्वसनाकडे कायम दुर्लक्ष करण्याबाबत

**(२४) १५४२३ (०९-०४-२०१५). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार देशात ८ ते ९ टक्के लोकसंख्या अपंगांची आहे , महाराष्ट्रात सुमारे १७ लाख अपंग व्यक्ती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अपंगांच्या पुनर्वसनासंबंधी अनेक योजना कालबाहय झाल्या असून, अपंग कल्याण धोरणही अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोकरीमध्ये अपंगासाठी ३ टक्के राखीव जागा आहेत मात्र प्रवर्गनिहाय अपंगत्वाची तीव्रता आणि अपंगाची सर्वेक्षण व्यवस्थित होत नसल्याने नोकरीमधील २ हजार जागांचा अनुशेष शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास,अपंगांसाठी विशेष शाळा, कार्यशाळा आहेत मात्र उच्च शिक्षणासाठी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या अपंगांसाठी राहण्याची कोणतीही विशेष सुविधा नसल्यामुळे अपंग विद्यार्थी उच्च शिक्षणापासून दूर राहतात याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही. उपलब्ध आकडेवारीनुसार सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील अपंगांची लोकसंख्या २९,६३,३९२ असून त्याची टक्केवारी २.६३ इतकी आहे.

(२) अंशतः खरे आहे. अपंग कल्याण धोरण तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) अंशतः खरे आहे. नोकरीमधील अपंगांचा अनुशेष २६४९ जागांचा आहे. तथापी सर्वेक्षण व्यवस्थित होत नसल्याने हा अनुशेष शिल्लक आहे असे म्हणता येणार नाही. अपंगांचे सर्व्हेक्षण आणि नोकरीमध्ये ३% राखीव जागा भरण्याची कार्यवाही सुरु असून २६४९ इतका असलेला अनुशेष भरुन काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. रिक्त पदे भरण्याबाबत सर्व संबंधितांकडे सतत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) सर्व शासकिय विभागाच्या शासकिय वसतिगृहामध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थान विकत घेऊन त्याचे स्मारकात रुपांतर करण्याबाबत

**(२५) १६२५९ (०६-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थान विकत घेऊन त्याचे स्मारकात रुपांतर करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २४ जानेवारी, २०१५ च्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) उक्त निर्णयाची अंमलबजावणी किती दिवसात करण्यात येणार आहे, त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२४-०९-२०१५) :** (१) शासन निर्णय दि.१६.०२.२०१५ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९२१-२२ मध्ये वास्तव्य केलेले लंडन येथील घर शासनाने खरेदी करुन आंतरराष्ट्रीय स्मारक म्हणून जतन करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) लंडन येथील घर खरेदी करण्याच्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी मा.मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, यांच्या अध्यक्षेतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. घर खरेदीची किंमत व त्यानुषंगाने पूर्ण करावयाच्या कायदेशीर बाबी / प्रक्रिया याबाबत सॉलीसीटर, भारतीय उच्चायुक्त व अन्य सर्व संबंधितांशी विचार विनिमय करुन त्यानुसार खरेदीबाबतची पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**विना अनुदानित महाविद्यालयाने बनावट विद्यार्थी दाखवून शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२६) १९१६८ (३०-०७-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कायम विनाअनुदानित महाविद्यालयात शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देय नाही असतानाही महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळातर्गत येणा-या राज्यातील २८२ कायम विना अनुदानित महाविद्यालयाने बनावट विद्यार्थी दाखवून सामाजिक न्याय विभागातर्फे तसेच केंद्र शासनाकडून सन २००१-०२ पासून आजतागायत मिळणा-या शिष्यवृत्तीचे ४०० कोटी रुपयांचे गैरव्यवहार केल्याची बाब माहे ऑगस्ट २००८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले सामाजिक न्याय विभागाच्या संबंधीत अधिका-यांवर तसेच महाविद्यालयावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०९-११-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे,

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सहायक आयुक्त, समाजकल्याण जिल्हा वर्धा कार्यालयातील एम.एस.बी.टी.ई च्या अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्ती वाटपामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे,

(२) सदर प्रकरणी तपासणी करुन नियमबाह्य शिष्यवृत्तीची उचल केल्याचे आढळून आलेल्या ९६ महाविद्यालयांना वसुलीबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या असून ३ कर्मचाऱ्यायांना निलंबित करण्यात आले, तसेच ७ अधिकाऱ्याविरुध्द प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कराडी समाजाचा मागासवर्गीय जातीमध्ये समावेश करण्याबाबत**

**(२७) १९८४७ (३०-०७-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कराडी समाजाचा केंद्र शासनाच्या मागासवर्गीय जातीमध्ये समावेश करण्याबाबतचे निवेदन दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय, असल्यास, याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-११-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) केंद्र शासनाच्या इतर मागास प्रवर्ग जातीच्या यादीत महाराष्ट्रातील जातींचा समावेश करण्याबाबत राष्ट्रीय पिछडा वर्ग आयोगाने दि.३१/५/२०११ ते २/६/२०११ या कालावधीत मुंबई येथे जनसुनावणी आयोजित केली होती. सदर झालेल्या जनसुनावणीत महाराष्ट्र शासनाने कराडी जातीचा प्रस्ताव सुनावणीकरिता ठेवला होता. परंतु, केंद्र शासनाकडून कराडी जाती समूहाचा समावेश इतर मागासवर्गीयांच्या यादीमध्ये करण्याबाबतचा निर्णय अद्याप प्रलंबित आहे. एखाद्या जाती समूहाची नोंद केंद्र शासनाच्या इतर मागासवर्गाच्या यादीत करणे ही बाब संपूर्णपणे केंद्र शासनाच्या अखात्यारितीतील आहे. राज्य शासन यात हस्तक्षेप करु शकत नाही.

---

## राज्यातील अपंग शाळांमधील कंत्राटी कर्मचा-यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(२८) २०४२२ (३०-०७-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपंग शाळांमधील (मुकबधीर, मतीमंद, अस्थिव्यंग, अंधशाळा आणि कर्मशाळा) या संस्थांमधील कंत्राटी कर्मचा-यांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाकडे मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-१०-२०१५) :** (१) होय.

(२) दि. १८.८.२००४ च्या आकृतीबंधानुसार सफाईगार, मदतनीस व पहारेकरी या पदांना कंत्राटी स्वरुपात भरण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करता येणार नाही. परंतु सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेणापूर (जि.लातूर) येथील शासकीय विश्रामगृहाचा अनधिकृत वापर होत असल्याबाबत

**(२९) २१०४१ (३१-०७-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) येथील शासकीय विश्रामगृहाचा मोठ्या प्रमाणावर अनधिकृत वापर व विश्रामगृहात अवैध धंदे राजरोसपणे सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधित दोषींवर शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसईतील (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना कार्यालयातील मनमानी कारभाराबाबत**

**(३०) २१३८३ (०६-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसईतील (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना कार्यालयातील मनमानी कारभारामुळे सुमारे ३०० गोरगरीब लाभार्थ्यांना गेल्या जून, २०१४ महिन्यापासून आर्थिक लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ३०० लाभार्थ्यांना त्यांचे थकित लाभ तात्काळ देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१६-११-२०१५) :** (१), (२) व (३) वसई तालुक्यातील संजय गांधी योजना समितीची बैठक दि. १९.०६.२०१४ रोजी आयोजित करुन या बैठकीत १२१ अर्जदारांचे अर्ज मंजूर करण्यात आले व २२ अर्जदारांना कागदपत्रांची पूर्तता करुन नव्याने अर्ज दाखल करण्याबाबत कळविण्यात आले. सदरह मंजूर लाभार्थ्यांना माहे जून, २०१४ पासून अनुदानाचा लाभ देण्यात येत आहे.

उक्त नमूद बैठकीनंतर विधानसभेच्या व जिल्हा परिषदेच्या निवडणुक आचारसंहितामुळे संजय गांधी समितीची बैठक, आयोजित करता आली नाही तथापि, दि. ०४.०३.२०१५ रोजी संजय गांधी समितीची बैठक आयोजित करुन या बैठकीत माहे जुलै २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीत प्राप्त झालेले ३१८ अर्ज निकातली काढले आहेत. सदर बैठकीमध्ये प्राप्त अर्जापैकी २२७ अर्जदारांचे अर्ज मंजूर केले व उर्वरित ९१ अर्ज विहित केलेल्या कागदपत्रांची व निकषांची पूर्तता करीत नसल्याने ते नामंजूर करण्यात आले आहेत. प्रस्तुतच्या मंजूर लाभार्थ्यांना माहे मार्च, २०१५ पासून अनुदानाचा लाभ देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रक्कमात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३१) २१७६४ (३०-०७-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड (पश्चिम) येथील श्रीमती नलिनीताई गजानन पुरंदरे विद्यालयातील इयत्ता १ ते इयत्ता १० वीच्या वर्गातील अनुसूचित जाती जमातींच्या विद्यार्थ्यीनींना सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम शाळेच्या व्यवस्थापनाने वीजबिज, पाणी बिलासाठी व दैनंदिन खर्चासाठी वापरल्याची तसेच शिष्यवृत्ती वाट्प न केल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेमध्ये मागील तीन वर्षापासून शिष्यवृत्ती वाटप रजिस्टरवर विद्यार्थ्यांच्या खोट्या सह्या करुन पैसे लाटले असल्याची तक्रार माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०९-११-२०१५) :** (१) सदर शाळेने शिष्यवृत्तीची रकमा कार्यालयीन बाबीवरील खर्चासाठी वापरली असल्याचे निदर्शनास आले आहे,

(२) सदर शाळेत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती,

(३) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई यांनी चौकशी समिती नेमली होती, सदर समितीने केलेल्या चौकशी नुसार संबंधित शाळेने यांनी मागासवर्गीय विद्यार्थीनीना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवणे, असंवितरीत रक्कम शासन जमा न करणे, शिष्यवृत्तीची रक्कम कार्यालयीन बाबीवर खर्च करणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या, या प्रकरणी संबंधित संस्थेने शाळेचे मुख्याध्यापक व लिपिक यांच्याविरुध्द पोलीस उपायुक्त, झोन क्र. ७ मुलुंड, मुंबई येथ तक्रार दाखल केली आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३२) २१७७१ (३१-०७-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता श्री.एम.बाय.शंखपाळे व उपविभाग, वाडा येथील सहाय्यक अभियंता श्री.डी.जी. होले यांनी बोगस बीले काढून १ कोटी ३७ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे वरिष्ठ विभागीय लेखाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी शासनाच्या निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गैरव्यवहार केलेल्या रकमेची वसुली करुन संबंधीत अभियंता यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) ठाणे (सा.बां.) विभागाच्या अखत्यारीतील सा.बां.उपविभाग, वाडा येथील देखभाल व दुरुस्तीची सुमारे १.३७ कोटी रुपयांची १६ देयके विभागीय लेखाधिकारी यांच्या संमतीशिवाय मंजूर केल्याची बाब वरिष्ठ विभागीय लेखाधिकारी यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर सदर देयकांचे धनादेश रद्द करण्यात आले आहेत.
(२) धनादेश रद्द करण्यात आले असल्याने वसुलीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि, प्रस्तुत प्रकरणी आढळून आलेल्या प्रशासकीय अनियमिततेच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागोठाणे (ता.पेण,जि.रायगड) येथील जलवाहिनी सुप्रिमो कंपनीने जलवाहिनी उध्वस्त केल्याबाबत

**(३३) २१७७३ (०४-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई - गोवा राष्ट्रीय मार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुमारे चार वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी मोठ्या प्रमाणात खोदकाम सुरु असून त्यामुळे पेण तालुक्यातील निम्याअधिक गावांना पाणीपुरवठा करणारी नागोठाणे (जि.रायगड) येथील जलवाहिनी सुप्रिमो कंपनीने उध्वस्त केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपनीच्या मनमानी कारभारामुळे पेण तालुक्यातील नागरीक पाण्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) होय.
(२) रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी आवश्यक खोदकाम करतेवेही एकूण पाच ठिकाणी जलवाहिनी खंडीत झाल्याचे निदर्शनास आले असल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.
(३) महाव्यवस्थापक (तांत्रिक) व प्रकल्प संचालक, पनवेल यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार तीन ठिकाणी खंडीत झालेली जलवाहिनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांच्यामार्फत दुरुस्त करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत एका ठिकाणी जलवाहिनी दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे, उर्वरित दुरुस्तीचे काम लवकर पूर्ण करण्याचे आवश्वासन सवलतदाराने दिले आहे.
(४) व (५) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, माणगाव विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार १२ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांचा पुरवठा सुरु करण्यात आला असून ८ कि.मी. जलवाहिन्या स्थलांतरणाचे काम पूर्ण झाले आहे व ४ कि.मी. जलवाहिन्या स्थालांतरीत करण्याचे काम अद्याप बाकी आहे.

---

## लोळाणे ते आलतूर (ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर) येथे कडवी नदी पात्रावरील पुल होण्याबाबत

**(३४) २१८६३ (०३-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोळाणे ते आलतूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे कडवी नदी पात्रावरील पुल होण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभागाने सर्वेक्षण पूर्ण केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलामुळे लोकांच्या वाहतुकीचा मोठा प्रश्न मार्गी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाच्या मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवस प्रलंबित असून, तसेच सदर प्रस्तावाला शासन तातडीने मान्यता देऊन आर्थिक तरतूद करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) व (२) होय.
(३), (४) व (५) प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**मौजे उपवळे (ता.शिराळा, जि.सांगली) येथील उपवळे ते शिराळा**
**या रस्त्यावरील मोरणा नदीपात्रात पुल बांधण्याबाबत**

**(३५) २२३३६ (१३-०८-२०१५). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उपवळे (कदमवाडी) ता.३२ शिराळा, जि.सांगली येथील उपवळे ते शिराळा (ग्रा.मा.क्र.३१) या रस्त्यावरील मोरणा नदीपात्रात पुल नसल्यामुळे तेथील नागरिकांना फार मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान मौजे उपवळे, कदमवाडी शिराळा या गावातील ग्रामस्थांची मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने मोरणा नदीपात्रात नवीन पूल अथवा पादचारी पूल होणेबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मोरणा नदीपात्रातील नवीन पूलाचे अथवा पादचारी पूलाचे बांधकाम किती कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१), (२), (३), (४) व (५) प्रश्नाधीन पूल हा ग्रा.मा.३१ या जिल्हास्तरीय रस्त्यावर असल्यामुळे प्रस्तूत पूलाचे काम जिल्हा नियोजन समितीची मान्यता, निकष व निधीच्या उपलब्धतेच्या अधिनतेने हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**दभाषी (ता.शिंदखेडा, जि.धुळे) येथील तापी नदीच्या पुलावर लोखंडी जाळी बसविण्याबाबत**

**(३६) २२८१२ (३१-०७-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दभाषी (ता.शिंदखेडा) व सावळेद ता.शिरपूर, जि.धुळ येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वर तापी नदीच्या पुलावरुन ३ ते ४ ट्रक पुलावरुन कोसळून अपघात झाल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तापी नदीचा पुल सदोष बनविल्यामुळे व कठड्यांना संरक्षण जाळी नसल्याने या ठिकाणावरुन गेल्या ५ वर्षात किमान ५० हून अधिक लोकांनी आत्महत्या देखील केल्या आहेत हे मे, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाला लोखंडी जाळी तयार करण्याची संबंधित परिसरातील ग्रामस्थांची मागणी असतांना देखील अद्याप लोखंडी जाळी बसविण्यात न आल्यामुळे अपघातांची मालिका सुरुच आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) सदर पुलाचे काम हे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत असलेला प्रकल्प संचालक धुळे यांच्या कार्यक्षेत्रात आहे. त्यांच्या प्रत अहवालानुसार सदर पुलावर जाळी बसविल्यास पुलावर डेड लोड (Dead Load) मध्ये वाढ होईल तसेच या पुलावर झालेल्या आत्महत्या हे संबंधीताचे मानसिक संतुलन बिघडल्याने घडलेल्या आहेत हे नमुद करण्यात आलेले आहे.

याबाबत पोलीस अधीक्षक धुळे यांनी पुलावरुन उडी मारुन केलेल्या आत्महत्या लोकांचे मानसिक संतुलन बिघडल्याने झालेल्या आहेत असे त्यांच्या प्राप्त अहवालात नमुद केलेले आहे.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचेवर नागपूर येथील महालेखापाल यांच्या पथकाने नोंदविले आक्षेप**

**(३७) २२८४३ (३०-०७-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचेवर नागपूर येथील महालेखापाल यांच्या पथकाने आक्षेप नोंदविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) प्रस्तुत लेखाआक्षेपामध्ये कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता व शासनस्तरावरीलल स्पष्टीकरणात्मक अभिप्राय सादर करण्याबाबत महालेखापाल, नागपूर यांनी निदेशीत केले आहे. त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**विदर्भात कृषि आधारित उद्योग उभारण्याबाबत**

**(३८) २३०९४ (३१-०७-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात कृषि आधारित उद्योग उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये कोणत्या उद्योगांचा समावेश आहे,

(३) असल्यास, सदरचे उद्योग विदर्भातील कोणत्या जिल्ह्यांमध्ये उभारण्यात येणार आहे, व हे उद्योग कोणत्या प्रकारे उभारण्यात येणार आहे,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२४-०९-२०१५) :** (१) कृषि व अन्न प्रक्रिया उद्योग स्थापन करण्याकरिता शासन सामूहिक प्रोत्साहन योजना, २०१३ अंतर्गत १० टक्के अतिरिक्त प्रोत्साहने देते व अशा कृषि आधारित उद्योगाचे प्रस्ताव विदर्भात मागणी झाल्यास त्यांना औद्योगिकदृष्टया मागास क्षेत्राच्या वर्गवारीप्रमाणे "ड + व नक्षलप्रभावित" क्षेत्रासाठी अनुज्ञेय लाभ देता येतात. शासनाकडून कृषि उद्योग उभारण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन नसून या उद्योगास निश्चितपणे प्रोत्साहने देण्यात येत आहेत.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील (ता.वसमत) येथील चीडी रेल्वे स्थानकाच्या ठिकाणी भुयारी मार्ग करण्याबाबत**

**(३९) २३८८५ (०७-०८-२०१५). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील (ता.वसमत) येथील चीडी रेल्वे स्थानकाच्या बाजूने जाणा-या रस्त्यावर रेल्वेच्या पूर्वेकडून दररोज कामधंदा करणारे नोकरदार, शेतकरी, विद्यार्थीवर्ग, प्रवासाकरीता एस.टी.बस स्थानकावर येणारे प्रवासी सर्वजण रेल्वे रुळ ओलांडून पश्चिमेकडे येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रेल्वे स्थानकावरुन दररोज एक्सप्रेस, पॅसेंजर व मालगाडया मिळून २० ते २५ रेल्वेगाड्या ये-जा करीत असतांना रेल्वे रुळ ओलांडून दररोज ये-जा करणे धोकादायक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ठिकाणी भुयारी मार्ग बनविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांना दिनांक ५ मे, २०१५ चे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर मागणी नुसार नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्नाधीन रेल्वे भुयारी पूल बांधण्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**अर्जुनी (ता. कागल, जि. कोल्हापूर) येथील संभाव्य एमआयडीसीसाठी जमीन संपदित करण्याबाबत**

**(४०) २३९२१ (१६-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील संभाव्य एमआयडीसीसाठी जमीन संपदित करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने संपादित करावयाच्या जमीनीच्या प्रतीगुंठयाच्या नुकसान भरपाईचा दर काढला आहे हे खरे आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या दरास स्थानिक नागरीकांनी तीव्र विरोध केला आहे काय तसेच त्यांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१०-२०१५) :** (१) अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी खाजगी २४३.१७ हे.आर व ४.५३ हे.आर.सरकारी असे एकूण २४७.७० हे.आर.क्षेत्र अधिसूचित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही. तथापि नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांच्यासोबत संबंधित खातेदारांची बैठक घेऊन वाटाघाटीने नुकसान भरपाईचे दर निश्चित करण्यात येणार आहेत.

(३), (४), व (५) अर्जुनी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील औद्योगिक क्षेत्रासाठी अद्याप नुकसान भरपाईचे दर ठरविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्यासमवेत संबंधित खातेदारांची बैठक झालेली नाही त्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

---

**बारावी धरणातील पाण्यावर वीज निर्मिती प्रकल्प बंद झाल्याबाबत**

**(४१) २४१४७ (०६-०८-२०१५). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवलीसह ठाणे जिल्हयाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या बारवी धरणाची उंची वाढविण्याचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असताना गावक-यांच्या विरोधामुळे पुनर्वसनाचे काम बंद झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने उक्त धरणातील पाण्यावर वीज निर्मिती प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असतानाही धरणाची उंची वाढविण्याचे काम प्रलंबित असल्यामुळे वीज निर्मिती प्रकल्प बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तसेच बारवी धरणाची उंची तसेच वीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वीत करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१०-२०१५) :** (१) हे अंशतः खरे आहे. सांडव्याचे काम करीत असताना बॅक वॉटरच्या फुगवटयामुळे ग्रामस्थांच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने ऑगस्ट, २०१४ ते जानेवारी, २०१५ या कालावधीत ग्रामस्थानी विरोध करुन कामे बंद पाडली होती.
(२), (३) व (४) हे खरे नाही. बारवी धरणातील पाण्यावर वीजनिर्मिती करण्याच्या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात होणार आहे. वीज निर्मितीसाठी लागणारी यंत्रसामुग्री ऑगस्ट, २०१४ मध्ये पुरविण्यात आली असून निर्माण झालेली वीज बारवी पाणीपुरवठा केंद्रापर्यंत नेण्यासाठी वीजवाहिनी व लागणारी उपकरणे यांची जून २०१५ मध्ये चाचणी करण्यात आली आहे. वीज निर्मितीच्या चाचण्यांचे काम सुरु असून कमी पावसामुळे पाण्याचा साठा कमी असल्याने चाचण्यांच्या कामात अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांची अंतिम मंजूरी प्राप्त झाली असून जलसंपदा विभागाची मंजूरी अंतिम टप्प्यात आहे.

---

## बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे देवथाबा-खामखेड-जांभुळथबा-हरणखेड-वडजी या रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणाबाबत

**(४२) २५४१८ (३१-०७-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे देवथाबा-खामखेड-जांभुळथबा-हरणखेड-वडजी हा प्रमुख जिल्हा मार्ग ५ कि.मी. लांबीचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना ये-जा करणे त्रासाचे झाले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०९-२०१५) :** (१) अंशतः खरे
विषयांकित रस्त्याचा ५ कि.मी. लांबीतील भाग अंशतः क्षतिग्रस्त झाला आहे.
(२) होय.
(३) होय.
कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, खामगांव यांना मौखिकरित्या सुचित केले आहे.
(४) व (५) रस्त्याच्या प्रश्नांकित लांबीमधील डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि रस्त्याची कायमस्वरुपी दुरुस्ती करण्यासाठी करावयाची कामे मंजूरी, निकष, निधी व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे दाताळ-उमाळी-वरखेड-तरवाडी या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४३) २५४१९ (३१-०७-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील मौजे दाताळ-उमाळी-वरखेड-तरवाडी हा प्रमुख जिल्हा मार्ग ६ कि.मी. लांबीचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारचाकी वाहन धारकांना ये-जा करणे त्रासाचे झाले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी १८० लक्ष रुपये निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्ता दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) उपरोक्त रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
प्रश्नाधीन रस्त्याच्या कामासाठी अंदाजे रुपये २०० लाख इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) होय.
(४) व (५) प्रश्नाधीन रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

## राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या येडशी व औरंगाबाद या टप्प्याच्या चौपदरीकरण कामाच्या भूसंपादन प्रक्रियेबाबत

**(४४) २५७७१ (३०-०७-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या येडशी व औरंगाबाद या टप्प्याच्या चौपदरीकरण कामाच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी विलंब होत असून तीन वर्षाच्या कालावधीत केवळ ६५ टक्के भूसंपादनाचे काम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद, बीड, जालना आणि औरंगाबाद या जिल्ह्यात भूसंपादनाच्या कामात होत असलेल्या विलंबामुळे शासनावर अधिकचा भार पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) भूसंपादनाची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांच्या अहवालानुसार मागील तीन वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण २१% भूसंपादन झालेले आहे.

(२) होय.

जमिनीच्या भूसंपादनाचे काम राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ अंतर्गत दिनांक २९.३.२०१२ पासून केले जात आहे. सदर कायद्यामध्ये जलद व अनिवार्य भूसंपादनासाठीची तरतूद आहे. परंतु जमिनीचे निवाडे विलंबाने दिल्यामुळे नवीन भूसंपादन कायद्याप्रमाणे मोबदला द्यावा लागणार आहे व तो सरासरी तिप्पट असण्याची शक्यता आहे.

(३) राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६ प्रमाणे भूसंपादन प्रगतीपथावर आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत भूसंपादन लवकर होण्यासाठी राज्य शासन विविध स्तरावर पाठपुरावा करीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या महाविद्यालयातील शिक्षक वेतनापासून वंचित असल्याबाबत

**(४५) २५९६३ (३०-०७-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उच्च माध्यमिक शाळांवर काम करणा-या प्राध्यापकांना दिनांक ३० मार्च, २०१५ पर्यत वेतन देण्यात येईल असे आश्वासन सामाजिक न्याय मंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालय अनुदानास पात्र असूनही या शाळा महाविद्यालयातील शिक्षक गेली ७ वर्षे वेतनापासून वंचित असल्यामुळे विविध माध्यमातून आंदोलने करुन मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव यांना निवेदन दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-१०-२०१५) :** (१), (२) व (३) विजाभज उच्च माध्यमिक आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पदनिर्मितीचा व वेतनाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावासंदर्भात उच्चस्तरीय समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या माहितीसह प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वळती बु.तो. वळती खु. (ता.नांदुरा, जि.बुलडाणा) येथील ज्ञानगंगा नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(४६) २६४३० (१३-०८-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर), श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा जिल्हयातील मलकापूर विधानसभा मतदार संघातील नांदुरा तालुक्यातील मौजे वळती बु.तो. वळती खु. रस्त्यावर ज्ञानगंगा नदीवर पुल नसल्यामुळे या रस्त्यावरुन सर्वसामान्य नागरीक, दुचाकी व चारकाची वाहन धारकांना आवागमन करणे त्रासाचे झाले असल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून या रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्यासाठी रु. ५० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर लहान पुल बांधणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त पुलाच्या बांधकामासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव यांना वेळोवेळी सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
प्रश्नाधीन पूलाच्या कामास पोचमार्गासह अंदाजे रुपये १.६० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(२) सदर रस्त्यावर उंच पूलाचे बांधकाम करणे गरजेचे आहे.

(३) होय.
(४) व (५) प्रश्नाधीन पूल हा ग्रामीण मार्गावर असून सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांच्यामार्फत प्राथमिक सर्वेक्षण केलेले आहे. सदर पूलाचे काम जिल्हा नियोजन मंडळाच्या निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय भू-विकास व जिल्हा भू-विकास बँकाबाबत**

**(४७) २६६१० (१४-०९-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी कृषी ग्रामीण (बहुउद्देशीय) भू-विकास व जिल्हा भू-विकास बँकाबाबत अभ्यास करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाने वित्त मंत्रीमहोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने यासंदर्भात अभ्यास करुन आपला अहवाल शासनास सादर केला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) व (२) होय.
(३) मंत्रीमंडळ उप समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने दि.१२.५.२०१५ च्या मंत्रीमंडळ बैठकीत भूविकास बँक संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून त्या अनुषंगाने दि.२४.७.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोहा नांदेड या राष्ट्रीय महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(४८) २६८८० (३१-०७-२०१५). श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहा-नांदेड या राष्ट्रीय महामार्गावर रहदारीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने या राष्ट्रीय महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) लोहा-नांदेड रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चा भाग असून लांबी ३१.२० कि.मी. आहे. उपलब्ध निधीच्या अधीन राहून रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुरळीत ठेवण्यात येत आहे. सदर लांबीतील नियतकालीक दुरुस्तीचे काम मंजूर असून सदर काम सप्टेंबर, २०१५ अखेर सुरु करण्याचा प्रयत्न आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोईठाण ते महिंदा (ता.आष्टी, जि.बीड) या राज्यमार्गाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४९) २७७८४ (३१-०७-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोईठाण ते महिंदा (ता.आष्टी, जि.बीड) येथील राज्यमार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याने सद्य:स्थितीत स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राज्यमार्गाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून केणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

महिंदा ते डोईठाण या एकूण १५.५० कि.मी. रस्त्यापैकी ५ कि.मी. रस्त्याचे काम प्रगतीत असून २ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.

(२) व (३) उर्वरित ८.५० कि.मी. रस्त्याचे दुरुस्ती करण्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याच्या प्रयत्न राहील.

---

**पाटोदा ते मांजरसुंबा (ता.पाटोदा, जि.बीड) येथील या राज्य मार्गाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५०) २७७८७ (३१-०७-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोदा ते मांजरसुंबा (ता.पाटोदा, जि.बीड) येथील राज्य मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्याने सद्य:स्थितीत स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राज्यमार्गाच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याच्या प्रयत्न राहील.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.